लोकमत

# छत्रपती शिवाजी महाराज पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीच्या वतीने प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी (दि.२५) साडेपाच वाजता शाहू स्मारक भवनात होणार आहे.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. तरी वाचकांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, ॲड. शिवाजीराव चव्हाण, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. विलास पोवार, डॉ. भारतभूषण माळी यांनी केले आहे.

22 DEC 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजमध्ये शुक्रवारी युवक महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्था संचलित न्यू कॉलेजमध्ये दि. २४ डिसेंबर रोजी ४१ व्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवात जिल्ह्यातील ५६ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला आहे. ९४६ विद्यार्थी १४ कलाप्रकारात सहभागी होणार आहेत. महोत्सवातील सर्व सहभागींना दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र किंवा ४८ तासांच्या आतील 'आरटीपीसीआर'चा अहवाल देणे बंधनकारक केले आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन शुक्रवारी सकाळी १० वाजता महापालिका प्रशासक कादंबरी बलकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमासाठी हुतात्मा किसन अहिर संकुलाचे प्रमुख वैभव नायकवडी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे विद्यमान चेअरमन के. जी. पाटील असणार आहेत

पुण्यनगरी

# न्यू कॉलेजमध्ये शुक्रवारी युवा महोत्सव

## ५६ महाविद्यालयांचा समावेश : प्राचार्य व्ही. एम. पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा युवा महोत्सव शुक्रवार, दि. २४ डिसेंबर रोजी न्यू कॉलेज कॅम्पसमध्ये होणार आहे. जिल्ह्यातील ५६ महाविद्यालयांतून ९४६ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला आहे. १४ प्रकारच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा होणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवारी सकाळी कॉलेजच्या प्रांगणात उभारलेल्या स्टेजवर महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ होईल. कार्यक्रमाला हुतात्मा उद्योग व शिक्षण समूह, वाळवा व श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे संचालक वैभवकाका नायकवडी, संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे.



कोरोनाचे सर्व नियम पाळून व्हॅक्सिनचे दोन डोस घेतलेल्या स्पर्धकांनाच या ठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. कोरोनामुळे गतवर्षी युवा महोत्सव ऑनलाईन घेतला होता; मात्र यंदा नियम पाळून, परवानगी घेऊनच युवा महोत्सव होणार. लोककृत्य किंवा लोककला, एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, पथनाट्य, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, वादविवाद, प्रश्नमंजूषा, नकला, सुगमगायक, मराठी, इंग्रजी व हिंदीतून वक्तृत्व अशा स्पर्धा होतील. यात यश मिळवलेल्या स्पर्धांची अंतिम फेरी गडहिंग्लज तालुक्यातील महागाव येथे दि. २७, २८ डिसेंबर रोजी होणार आहे.

पत्रकार परिषदेला उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, संयोजन समितीचे डॉ. सागर देशमुख, प्रा. जी. आर. पाटील, प्रा. अमर सासने, प्रा. डॉ. नीलेश पवार, प्रा. किरण नेऊरवाडे आदी उपस्थित होते.

सकाळ

# न्यू कॉलेजमध्ये शुक्रवारी विद्यापीठाचा युवा महोत्सव

## प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील : तयारी अंतिम टप्प्यात

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव शुक्रवारी (ता.२४) होणार आहे. यंदा न्यू कॉलेजने याचे आयोजकत्व स्वीकारले असून, याची तयारी झाली आहे, अशी माहिती महोत्सवाच्या संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, 'महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी सव्वादहा वाजता महापालिकेच्या प्रशासक कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते, तर श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेचे संचालक वैभव नायकवडी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष के. जी. पाटील असतील. महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त यंदा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या यजमान पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. स्पर्धक आणि प्रेक्षक,



विद्यार्थ्यांनी कोरोना लसीचे दोन डोस घेतले असतील, तरच त्यांना प्रवेश दिला जाणार आहे. लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, भारतीय समूहगीत, सुगम गायन, वक्तृत्व, वादविवाद, एकांकिका, पथनाट्याचा समावेश आहे. महोत्सवात ५६ महाविद्यालयांतील सुमारे १ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. डॉ. टी. के. सरगर, एस. ए. देशमुख, एम. वाय. कांबळे, नीलेश पोवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
22 DEC 2021
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजमध्ये शुक्रवारी जिल्हास्तरीय युवा महोत्सव

## न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्‌घाटन शुक्रवार २४ रोजी महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. ५८ महाविद्यालयातून ९६३ विद्यार्थ्यांनी १४ कलाप्रकारासाठी सहभाग नोंदवला आहे, अशी माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे शतक महोत्सी वर्ष, महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष, महाविद्यालयाला नॅकचे 'ए प्लस' मानांकन आणि आता जिल्हास्तरीय युवा महोत्सव हा दुग्धशर्करा योग आहे. त्यामुळे



न्यु कॉलेज परिवार युवा महोत्सव यशस्वीपणे पार पडण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करीत आहे. युवा महोत्सवात १४ कलाप्रकार आहेत, यासाठी ८ स्टेज तयार केले आहे. लोकनृत्यासाठी २९ संघांनी सहभाग नोंदवला आहे. सहभागी विद्यार्थ्यांनी कोरोनाचे दोन डोस असलेले सर्टीफिकेट किंवा आरटीपीसीआर चाचणी सर्टीफिकेट बरोबर घेवून येणे बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे या दोन्हीपैकी काहीच नसेल त्यांना युवा महोत्सवात सहभाग घेता येणार नाही.

**कलाप्रकार व वेळ अनुक्रमे पुढीलप्रमाणे :** लोकसंगीत वाद्यवृंद, सकाळी ११ ते दुपारी २, लोककला दुपारी २ ते ५ , लोकनृत्य सायंकाळी ५ ते रात्री ८.३०, लघुनाटिका सकाळी ११ ते दुपारी २, मुकनाट्य दुपारी २ ते सायंकाळी ५, नकला सायंकाळी ५ ते ७.३०, भारतीय समूहगीत सकाळी ११ ते दुपारी २.३०, सुगम गायन दुपारी २.३० ते सायंकाळी ५, वक्तृत्व इंग्रजी सकाळी ११ दुपारी ३, वक्तृत्व मराठी सकाळी ११ दुपारी ३, वक्तृत्व हिंदी सकाळी ११ दुपारी ३, वादविवाद दुपारी ३ ते सायंकाळी ५, **एकांकिका :** सकाळी ११ ते रात्री ८.३०, पथनाट्य सकाळी ११ ते सायंकाळी ५.२०.

यावेळी उपप्राचार्य डॉ. टी. के. सरगर, डॉ. सागर देशमुख, प्रा. अमर सासने, डॉ. ए. ए. कलगुंडा, प्रा. जी. आर. पाटील आदी उपस्थित होते.